# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक

# घटक २ : शैक्षणिक सुधारक

# १) महर्षी धोंडो केशव कर्वे

**प्रास्ताविक**

महर्षी धोंडो केशव कर्वे म्हणजे स्त्री शिक्षणाला वाहिलेले समर्पित व्यक्तिमत्व होय. कर्वे स्त्रियांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अविरत कार्य करणारे महापुरुष, लोकोत्तर सेवामूर्तीच होते. स्त्रियांचा उद्धार झाल्याशिवाय देशाचा उद्धार होणार नाही हे ओळखणारे कर्वे हे सुधारक होते. महर्षी ही पदवी त्यांना लोकांनी बहाल केली होती.

महर्षी कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुड या गावी झाला घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. प्राथमिक शिक्षक सोमण गुरुजीपासून त्यांना निःस्वार्थीपणा, प्रामाणिकपणा, लोकसेवा करण्याची प्रेरणा मिळाली. १८७६ मध्ये ते सहावीत होते. सहावीची परीक्षा सरकारी होती त्यासाठी मोजकीच परीक्षा केंद्रे होती कर्वे यांना जवळचे सातारा केंद्र घ्यावे लागले की परीक्षा देण्यासाठी ते कुंभार्ली घाटातून पाई चालत १२५ अंतर कापून साताऱ्याला गेले पुढे सातवीचे शिक्षण घेऊन १८८१ मध्ये ते मॅट्रिक झाले नंतर गणित विषय घेऊन त्यांनी मुंबईच्या विल्सन कॉलेज मध्ये शिक्षण पूर्ण केले. शिक्षण चालू असताना १८७३ मध्ये त्यांचा राधाबाईशी विवाह झाला होता. पुढे कर्वे यांनी एलफिन्स्टन हायस्कूलात शिक्षकाची नोकरी पत्करली. १८९१ मध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्रोफेसर झाले. उत्तम प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. याच काळात ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थी फंड योजना राबविली व स्वतःच्या पगारातील काही भाग ते या फंडास देऊ लागले.

१९६२ मध्ये १०४ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीत, सुधारणा क्षेत्रातील विशेषतः शिक्षण क्षेत्रातील कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या सुधारणा कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे ...

**१) विधवा विवाहोत्तेजक मंडळी**

समाजात विधवांची स्थिती अत्यंत गंभीर व हलाखीची होती त्यांच्यावर प्रचंड अन्याय अत्याचार होत असे समाजात बालविवाह पद्धत होती त्यामुळे मुलींना लवकरच वैधव्य तसे

अशा विधवांचे जीवन नरकयातना सारखे असायचे अशा विधवांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी महर्षी कर्वे यांनी १८९३ मध्ये विधवाविवाहाला चालना देणारी विधवा विवाहोत्तेजक मंडळी नावाची संस्था स्थापन केली या संस्थेने अनेक विधवाविवाह घडवून आणले. १८९५ मध्ये या संस्थेचे नामांतर विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी असे करण्यात आले. या संस्थेच्या चिटणीसपदी ते १८९९ पर्यंत होते. विधवांना मूळ प्रवाहात आणण्याचा कर्वे यांना ध्यास होता त्यातून त्यांनी विधवांची दैनंदिन स्थिती सुधारायची असेल तर त्यांना समर्थ करण्यासाठी त्या सुशिक्षित होणे गरजेचे आहे हे कर्वे यांनी ओळखले होते.

**२) कृतीशील सुधारक**

कर्वे यांनी विधवा विवाहाचा पुरस्कार केला. त्यांनी याबाबत केवळ उपदेश केला नाही तर स्वत:वर वेळ आली तेव्हा त्यांनी याच विचारानुसार आचरणही केले. पहिल्या पत्नी राधाबाईच्या निधनानंतर पुन्हा विवाह करायचा तर तो विधवेशीच असा निश्चय केला. आणि त्यानुसार महर्षी कर्वे यांनीही ११ मार्च १८९३ रोजी पंडिता रमाबाईच्या शारदाश्रमातील गोदावरी उर्फ आनंदीबाई जोशी या बालविधवेशी विवाह केला. हा विधवा विवाह म्हणजे पुण्यात जाहीरपणे आगरकरांच्या उपस्थितीत झालेला पहिलाच पुनर्विवाह होय. सनातनी लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला पण कर्वे घाबरले नाहीत. उलट पुनर्विवाह प्रश्नावर लोक जागृती व्हावी म्हणून महाराष्ट्रभर दौरे काढले.

**३) अनाथ बालिकाश्रम**

केशवपण बालविवाह जरठबाला विवाह यासारख्या अन्याय्य रूढी यामध्ये अडकलेल्या स्त्रियांना मोकळा श्वास मिळावा म्हणून १४ जून १८९६ रोजी सहा स्त्रियांसह त्यांनी अनाथ बालिकाश्रम काढला. स्वतः कर्वे या संस्थेचे चिटणीस तर डॉ . आर . जी . भांडारकर अध्यक्ष होते. त्यावेळी समाजातील विधवा स्त्रियांना आपले जीवन निरर्थक वाटत असे.त्यापेक्षा न जगणे चांगले असे त्यांना वाटत असे अशी त्यांची अवस्था होती. अशा स्त्रियांना सन्मानाने जगता यावे तसेच अनाथ सोडून दिलेल्या स्त्रिया यांच्या जीवनाची फरफट होऊ नये यासाठी त्यांच्या शिक्षणाच्या सोयीसाठी कर्वेनी अनाथ बालिकाश्रम नावाची संस्था स्थापन केली. पण यात आलेल्या मुलींना पुनर्विवाह करावा लागेल भीतीने यात येणाऱ्या मुलींची संख्या कमी होती. पुण्यातील सदाशिव पेठेत स्थापन झालेल्या या संस्थेने प्लेगच्या काळात हिंगणे येथे स्थलातंर केले. सुरुवातीला एका झोपडीत एका विद्यार्थिनीसह सुरु झालेल्या या आश्रमात पुढे संख्या वाढतच गेली. सनातनी बुरसटलेल्या विचारांच्या लोकांचा प्रचंड विरोध सहन करून कर्वे यांनी

अनाथ बालिकाश्रम च्या माध्यमातून अबला स्त्रियांना सन्मानाने जगण्याची उमेद दिली. निराधार स्त्रियांसाठी अनाथ बालिकाश्रम हे निवास व शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनले.

**४) शैक्षणिक कार्य**

महर्षी कर्वे यांनी स्त्री शिक्षण ही परमेश्वराची आराधना व देशकार्य मानून आयुष्यभर काम केले. लहान मुलींपासून जेष्ठ महिलापर्यंत सर्वांच्या शिक्षणासाठी कर्वे यांनी कार्य केले आहे. त्यासाठी त्यांनी विविध संस्था स्थापन केल्या. केवळ तात्त्विक नाही तर नृत्य संगीत अशा विविध कलांच्या शिक्षणालाही प्राधान्य दिले. मातृभाषेतून शिक्षणाचा पुरस्कार करताना काळाची गरज असलेल्या इंग्रजी भाषेचे महत्त्व ओळखूनही कार्य केले. महर्षी कर्वे थोर शैक्षणिक विचारवंत होते त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणले. समाजामधील बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार, अनिष्ट रूढी, या वाईट प्रथांना आळा घालायचा असल्यास स्त्री शिक्षणाशिवाय पर्याय नाही असा विश्वास कर्वे यांना वाटत होता त्यातून त्यांनी स्त्री शिक्षणासाठी मोलाचे योगदान दिले.

**५) शैक्षणिक संस्था**

महर्षी कर्वे यांनी आपल्या कार्यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या. १८९६ मध्ये अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. १९०७ मध्ये हिंगणे येथे महिला विद्यालय स्थापन केले. १९१६ स्थापन केलेले महिला विद्यापीठ भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे. पुण्यात १९१८ मध्ये कन्या शाळा सुरु केली. पुणे येथे बाल अध्यापन मंदिर व शिशुविहार यांची स्थापना केली तर महाराष्ट्र ग्राम शिक्षण मंडळाची स्थापना १८५६ मध्ये केली होती. पुण्याबाहेरही कर्वे यांच्या संस्थाचे कार्य पोहोचले होते. सातारा येथे बालमनोहर मंदिर स्थापना १९६० मध्ये करण्यात आली. त्यांच्या संस्था व शाखांनी ग्रामीण दुर्गम भागातील स्त्रियांनाही शिक्षणाची संधी मिळवून दिली.

**६) महिला विद्यालय**

महिलांचा विकास व्हावा त्यांना उपयुक्त शिक्षण मिळावे यासाठी कर्वे यांनी ४ मार्च १९०७ रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या लकडी पुला जवळील जुन्या वाड्यात महिला विद्यालयाची स्थापना केली. पुढे हे विद्यालय हिंगणे येथील आश्रमाशेजारी नेऊन निवासी विद्यालय (बोर्डिंग स्कूल) सुरु झाले. १९०७ मध्ये कर्वे यांनी ज्ञानप्रकाश वृत्तपत्रात त्यांनी या विद्यालय स्थापनेचे उद्देश सांगणारा लेख लिहिला. त्यात त्यांनी कर्तव्याची जाणीव, गुण

विशेषांची जोपासना, संमती वय अशा अनेक मुद्द्यांची माहिती दिली होती. स्त्रियांना शिक्षण देऊन स्वावलंबी केल्याशिवाय त्यांची दु:खे कमी होणार नाहीत असा त्यांचा विश्वास होता. स्त्रायांना त्यांच्या आवडीनुसार व त्यांच्या नेहमीच्या जीवनात उपयोगी उपयुक्त ठरेल व त्यांच्या स्वभावाला रूचेल असा अभ्यासक्रम आखण्यात आला होता. यामध्ये आरोग्यशास्त्र, शिशू संगोपन, गृहजीवन शास्त्रा इ.चा समावेश होता. विद्यालयाच्या खर्चासाठी त्यांनी दोन फंड उभे केले होते. या विद्यालयात विधवा बरोबर कुमारीकाही येऊ लागल्या होत्या.

**५) महिला विद्यापीठ**

जपान मधील महिला विद्यापीठाबाबत मिळालेली माहिती व तेथे दिलेल्या भेटीने महर्षी कर्वे प्रभावित झाले. जपानप्रमाणे भारतातही महिलांना उच्च शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठ असावे कारण पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया फार मागे राहणे राष्ट्रहितासाठी घातक असते. या भूमिकेतून कर्वेंनी भारतात पहिले महिला विद्यापीठ स्थापन केले. १९१५ च्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून कर्वे यांनी अशा विद्यापीठाची कल्पना बोलून दाखविली होती व ३ जून १९१६ रोजी भारतवर्षीय महिला विद्यापीठाची अधिकृत स्थापना झाली. यावेळी भारतात स्त्रियांना स्वतंत्र उच्च शिक्षण देणारी संस्था नव्हती. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून रा.गो.भांडारकर व उपकुलगुरू म्हणून रंग्लर र.पु.परांजपे यांनी कार्यभार स्वीकारला. स्त्रियांना उच्च शिक्षण देणे, विविध कलांचे शिक्षण देणे, त्यांना स्वावलंबी करणे, जबाबदार बनविणे, कुटुंब सुदृढ करून राष्ट्राचे घटक असल्याचीही जाणीव वाढविणे, देश प्रगतीसाठी काम करणे, अंधश्रद्धा दूर करणे व समाजातील सर्व स्त्रियांना शिक्षण उपलब्ध करून देणे हे या विद्यापीठाच्या स्थापनेमागील उद्देश होते. या विद्यापीठाच्या उभारणीसाठी विठ्ठलदास ठाकरसी यांनी आईच्या नावे १५ लाखाची देणगी दिली.त्यामुळेच त्यांची आई श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी यांचे नाव विद्यापीठाला देण्यात आले. आज महिला सक्षम बनविण्यात या विद्यापीठाचा सिंहाचा वाटा आहे.

**५) महिला विद्यापीठाचा विस्तार**

हिंगणे येथे महिला पाठशाळा महिलाश्रम व अध्यापक शाळा या विद्यापीठाच्या होत्या. आश्रमाने चालविलेले कॉलेज व चिपळूणकरांनी काढलेली पुण्यातील कन्याशाळा पुढे या विद्यापीठास जोडण्यात आली. विद्यापीठाने प्राथमिक ते उच्च अशा सर्व प्रकारच्या शिक्षणात योगदान दिले. १९३१ मध्ये या विद्यापीठाने मुंबईत पहिले महाविद्यालय सुरु केले. १९३६ मध्ये विद्यापीठ पुण्याहून मुंबईस स्थलांतरीत करण्यात आले. १९४९ मध्ये भारत सरकाने या

विद्यापीठास औपचारिक मान्यता दिली. सातारा, सांगली व बेळगाव येथे स्थानिकांच्या साह्याने दोन वर्ग सुरू करून दरवर्षी एकेक वर्ग वाढवून पूर्ण हायस्कूल सुरु होऊन ती विद्यापीठास जोडली. पुढे नगर, सिंध, हैदराबाद, नागपूरपर्यंत विद्यापीठांच्या कक्षा जाऊन पोहोचल्या. माध्यमिक शिक्षणाची सोय मराठी, गुजराती, तेलगू व सिंधी या ४ भाषांतून केली गेली तर उच्च शिक्षणाची सोय मराठी, गुजराती व सिंधी या भाषेतून केली गेली.

**६) ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ**

शहराप्रमाणे ग्रामीण भागातही स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळावी.त्यांचाही दर्जा उंचवावा या विचाराने महर्षी कर्वे यांनी प्रयत्न केले.हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेप्रमाणेच त्यांनी ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ ही संस्था स्थापन केली.त्यामुळे ग्रामीण भागातही स्त्री शिक्षणाला गती मिळाली.

**७) निष्काम कर्ममठ**

महर्षी कर्वे यांनी १९१० मध्ये निष्काम कर्ममठ ही संस्था स्थापन केली. निष्काम म्हणजेच निरपेक्षपणे लोकसेवा करणाऱ्यांचा हा मठ होता. महर्षी कर्वे यांनी सुरू केलेले समाज विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना निस्वार्थ सेवक हवे होते. स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य करणारे निष्ठावान कार्यकर्ते निर्माण व्हावेत या उद्देशाने या मठाची स्थापना झाली या मठात सामील होणाऱ्याला मी आज पासून मठाचा सेवक झालो आहे मग देईल ती जबाबदारी मी निरपेक्षपणे व स्वेच्छेने पूर्ण करीन अशी शपथ घ्यावी लागत असे.या मठाच्या माध्यमातून महर्षी कर्वे यांनी निस्वार्थी कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केली. स्वत:च्या निवृत्तीनंतर मोजकेच पैसे स्वत:कडे ठेऊन त्यांनी आपली सर्व पुंजी निष्काम कर्ममठास दिली.

**८) समारोप**

महाराष्ट्राच्या समाजजीवनात स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व नव्हते. ती जणू काही कळसूत्री बाहुली होती. चार भिंतीच्या आत कोंडलेली चुल मूल हेच सर्वस्व समजणारी खाल्ल्या अन्नाला जागणारी अन्न वस्त्रची समाजपुरूषाच्या हातातील ती एक खेळणी होती. अशा काळात कर्वे यांनी बालविधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, अस्पृश्यतानिवारण याबाबत कार्य सुरु केले. त्यांनी केलेले शिक्षण कार्य विशेष महत्वाचे आहे. त्याव्दारे त्यांनी समाजात स्त्रियांना पुरूषांप्रमाणे प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या पत्नी आनंदीबाई म्हणजेच बाया कर्वे यांची त्यांना या कार्यात झालेली मदतही मोलाची आहे. कर्वे यांनी केवळ स्त्री शिक्षणावरच नाही तर जातीभेद आणि

अस्पृश्यता निर्मूलनासाठीही प्रयत्न केले आहेत. स्त्री उद्धारासाठी सर्वस्व खर्च करणाऱ्या महर्षी कर्वे यांच्या कार्याची अनेकांनी दखल घेतली आहे. त्यांचा गौरव केला आहे. बनारस, एसएनडीटी व मुंबई विद्यापीठाने त्यांचा डीलीट पदवी देऊन गौरव केला आहे. त्यांच्या अतुलनीय कार्यामुळे त्यांना महर्षी म्हणून ओळखले जाते भारत सरकारने त्यांचा पद्मभूषण व १९५८ मध्ये भारतातील सर्वोच्च सन्मान भारतरत्न देऊन त्यांचा गौरव केला आहे. अनेक महिलांना जीवनाचा प्रकाश दाखविणाऱ्या महर्षी कर्वे यांचा वयाच्या १०४ व्या वर्षी १९६२ मध्ये मृत्यू झाला.